**राम नाईक**
पूर्व पेट्रोलियम मंत्री

9 शिवस्मृति, 51, जयप्रकाश नगर
गोरेगाव पूर्व, मुंबई 400 063.
दूरभाष : 022-2686 33 39, फैक्स : 022-2686 11 33
ई मेल : ramnaik@vsnl.com

**कृपया प्रसिध्दीसाठी** **5 सप्टेंबर 2008**

## कुष्ठपीडित कुटुबांच्या अनुदानात लवकरच रु. 750 ची वाढ - राम नाईक

**मुंबई, शुक्रवार :** "कुष्ठपीडित कुटुंबाला मिळणारे रु. 600/- चे मासिक अनुदान रु. 750/-करण्याचे आदेश 15 दिवसांच्या आत काढण्यात येतील," असे आश्वासन सामाजिक न्याय मंत्री श्री. चंद्रकांत हंडोरे यांनी गुरुवारी माजी पेट्रोलियम मंत्री श्री. राम नाईक व भाजपा मुंबईचे अध्यक्ष आणि आमदार श्री. गोपाळ शेट्टी यांना दिले. कुष्ठपीडितांच्या समस्यांबाबत चर्चा करण्यासाठी सामाजिक न्याय मंत्र्यांनी श्री. नाईक, श्री. शेट्टी यांना निमंत्रित केले होते; त्यावेळी हे आश्वासन देण्यात आले.

या संदर्भात तपशीलावार माहिती देताना श्री. नाईक म्हणाले, "कुष्ठपीडितांच्या पुनर्वसनाबाबत गेली तीन वर्षे आम्ही शासनाशी चर्चा-पत्रव्यवहार करीत आहोत. त्यामुळे कुष्ठपीडितांचे अनुदान वाढवून प्रत्येकी रु. 500/- करण्यात आले होते, मात्र कुटुबांत दोन कुष्ठपीडित असल्यास त्यांना संयुक्तपणे फक्त रु.600/- दिले जात होते. ह्या अन्याय दूर करण्याबाबत आमचे प्रयत्न सुरु होते. याबाबत गेल्या महिन्यात 6 ऑगस्ट रोजी ते अनुदान कुटुंबासाठी रु. 750/- करण्याचे आश्वासन उपमुख्यमंत्री श्री. आर.आर.पाटील यांनी दिले होते, परंतु त्याबद्दल 'शासन निर्णय' जाहीर झाला नव्हता. काल झालेल्या बैठकीत "येत्या 15 दिवसात हे अनुदान कुटुंबासाठी रु.750/- करण्याचा 'शासन निर्णय' निश्चितपणे काढण्यात येईल," असे मंत्री श्री. हंडोरे यांनी सांगितले आहे.

एरवी 40 टक्के अपंगत्व असणा-यांना जे आरक्षण असते ते सरकारी नियमात कुष्ठपीडितांना कागदोपत्री उपलब्ध आहे. तथापि, अजूनही कुष्ठरोगाला सामाजिक कलंक मानले जाते. याबाबतच्या गैरसमजुतींमुळे कुष्ठपीडिताला नोकरी मिळणे दुरापास्त होते. म्हणून त्याला रोगामुळे किती टक्के अपंगत्व आले हे न पाहाता आरक्षणाचा लाभ मिळावा, अशी मागणीही श्री. नाईक व श्री. शेट्टी यांनी चर्चेच्या वेळी केली. "याबाबत केंद्र सरकारच्या कायद्यात बदल करणे आवश्यक आहे; मात्र तसे करण्याची गरज नक्कीच आहे. केंद्र सरकारकडे तशी राज्याकडून शिफारस केली जाईल," असे आश्वासनही यावेळी श्री. हंडोरे यांनी दिले. समाजातील गैरसमजांचा फटका कुष्ठपीडितांच्या मुलांना तर जास्तच बसतो, तसेच अनेक कुष्ठपीडित काम करु शकत नसल्याने मुलांवरच त्यांची भिस्त असते. त्यामुळे नोक-यांमध्ये कुष्ठपीडितांच्या मुलांना आरक्षण देण्याबाबत श्री. राम नाईक यांची सूचना आपण मंत्री मंडळापुढे ठेवून त्याप्रमाणे निर्णय घेण्याचा प्रयत्न करु, असेही श्री. हंडोरे यांनी सांगितले.

राज्यभर विविध ठिकाणी असलेल्या कुष्ठपीडितांच्या वस्त्यांमध्ये आठवडयातून एकदा शासनाचा कर्मचारी रुग्णांच्या जखमांच्या मलमपट्टीसाठी आणि इतर उपचारांसाठी जाणे अपेक्षित असते. दुर्दैवाने या कामात अनेकदा ढिलाई होते. सार्वजनिक रुग्णालयात रुग्णांना खूपच ताटकळावे लागते, त्यांची अवहेलनाही होते. त्यावर उपाय म्हणून वस्त्यांमधूनच एखाद्याचे प्रशिक्षण करवून त्याच्याकडून मलमपट्टी करुन घेण्याची तयारी कुष्ठपीडित संघटनेचे अध्यक्ष श्री. भीमराव मधाळे व श्री. प्रकाश मधाळे यांनी दाखविली. त्यांनतर अशा व्यक्तीला दरमहा रु. 3,000/- मानधन देण्याबाबत विचार करुन लवकरात-लवकर निर्णय घेऊ, असे आश्वासन श्री. हंडोरे यांनी दिले.

शासन आता अधिक कालापव्यय न करता या निर्णयांची अंमलबजावणी करेल, अशी अपेक्षा श्री. राम नाईक व श्री. गोपाळ शेट्टी यांनी व्यक्त केली. सदर चर्चेमध्ये उत्तर मुंबई - भाजपा अध्यक्ष व नगरसेवक श्री. योगेश सागर, तसेच सार्वजनिक आरोग्य विभाग व अपंग कल्याण विभागाचे वरिष्ठ अधिकारीही सहभागी झाले होते.

(कार्यालय सचिव)